विशेष भरती मोहीमे अंतर्गत खालील पदांकरीता जाहीरात

**रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात - २००९**

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखालील महसुल प्रशासनातील खालील नमुद वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व महसूल विभागात भरतीसाठी इच्छुक उमेदवारांना सोबतच्या विहित नमुन्यातील आपला अर्ज पत्र व्यवहाराकरीता नमुद पत्यावर **दिनांक ११ नोव्हेंबर,२००९ रोजी सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचेल अशा रितीने पाठवावा.

| अ. क्र. | पदनाम व वेतनश्रेणी | जात प्रवर्ग व पदसंख्या | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | माजी सैनिक | महिला | खेळाडु | एकुण | **अपंग** |
| १. | लिपीक-टंकलेखक (वर्ग-३) वेतनश्रेणी (बँड) ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | अनु.जाती | | १ (महिला) | २ | | | ३ | लिपीकांचे एकुण **३४** रिक्त पदापैकी अपंगाची अंध अथवा लो-व्हीजन -०२ पदे व कर्ण/मुकबधीर -०१ पद |
| | | अनु.जमाती | | १ (महिला) | २ | २ | १ | ६ | |
| | | वि.जा.(अ) | १ | | १ | २ | | ४ | |
| | | भ.ज.(ब) | | | १ | | | १ | |
| | | भ.ज.(क) | | | १ | | १ | २ | |
| | | भ.ज.(ड) | | | १ | १ | | २ | |
| | | वि.मा.प्र. | | | | | १ | १ | |
| | | इ.मा.व. | | १ | ५ | ७ | २ | १५ | |
| | | **एकुण** | १ | ३ | १३ | १२ | ५ | ३४ | |
| २. | तलाठी (वर्ग-३) वेतनश्रेणी (बँड) ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० | अनु.जाती | १ (महिला) | १ (महिला) | | | १ | ३ | - |
| | | अनु.जमाती | | १ | ३ | ४ | २ | १० | |
| | | भ.ज.(ब) | २ पैकी १ महिला | | | | | २ | |
| | | भ.ज.(क) | | १ | | | | १ | |
| | | वि.मा.प्र. | १ (महिला) | | | | | १ | |
| | | इ.मा.व. | १ (महिला) | २पैकी १महिला | २ | २ | १ | ८ | |
| | | खुला | २ | १ | ४ | | | ७ | |
| | | **एकुण** | ७ | ६ | ९ | ६ | ४ | ३२ | |
| ३. | शिपाई (वर्ग-४) वेतनश्रेणी (बँड) ४४४०-७४४० ग्रेड वेतन-१३०० | अनु.जाती | | | | | १ | १ | शिपाई एकुण **१६** रिक्त पदापैकी अपंगाचे कर्ण/ मुकबधीर-०१ पद |
| | | अनु.जमाती | | | १ | | १ | २ | |
| | | भ.ज.(ब) | | १ | १ | | | २ | |
| | | भ.ज.(ड) | | | १ | | | १ | |
| | | वि.मा.प्र. | | | | | १ | १ | |
| | | इ.मा.व. | १ (महिला) | १ | १ | | १ | ४ | |
| | | खुला | २ | १ | १ | | १ | ५ | |
| | | **एकुण** | ३ | ३ | ५ | | ५ | १६ | |

**१. लिपीक-टंकलेखक (वर्ग-३) पदासाठी शैक्षणिक अर्हता**

i) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण,

ii) मराठी-३० किंवा इंग्रजी-४० शब्द प्रतिमिनीट टंकलेखन परीक्षा मान्यताप्राप्त संस्थेमार्फत उत्तीर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र,

iii) सामान्य विभाग, शासन निर्णय क्र.:२०००/प्र.क्र.६१/२००१/३९,दिनांक १९.३.२००३ नुसार निवड झालेल्या उमेदवारास दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. मुदतीत संगणक प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा आपोआप समाप्त होईल.

**२. <u>तलाठी (वर्ग-३) पदासाठी शैक्षणिक अर्हता</u>**

i) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण,

ii) सामान्य विभाग, शासन निर्णय क्र.:२०००/प्र.क्र.६१/२००१/३९,दिनांक १९.३.२००३ नुसार निवड झालेल्या उमेदवारास दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. मुदतीत संगणक प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची सेवा आपोआप समाप्त होईल.

**३. <u>शिपाई (वर्ग-४) पदासाठी शैक्षणिक अर्हता</u>**

१. किमान ४ थी इयत्ता उत्तीर्ण.

२. मराठी लिहीता, वाचता येणे आवश्यक.

**<u>इतर अर्हता</u>**

**१. शुल्क :-** उमेदवाराने अर्जासोबत तलाठी व शिपाई पदासाठी **खुल्या** प्रवर्गातील उमेदवार यांनी रुपये २००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवाराने रुपये १०० /- चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डि.डि.) व लिपीक-टंकलेखक पदासाठी **खुल्या** प्रवर्गातील उमेदवार यांनी रुपये १५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवाराने रुपये ७५/- चा धनाकर्ष (डि.डि.) प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद या नावाचा सोबत जोडावा . तसेच माजी सैनिकाना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही.

२. प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/माजी सैनिक/ खेळाडु यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र जोडावे.

३. खेळाडुच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय, अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडु, राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा ऑलिम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्चस्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडुंचा यासाठी विचार करता येणार नाही. तसेच राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती अर्ज करण्यास पात्र राहील.

४. अंध अथवा लो-व्हीजन/कर्ण/मुकबधीर असलेला उमेदवार (४० % अथवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेली व्यक्ती) यांनी अपंगत्वाबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अथवा शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय यांचा अपंगत्वाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. सर्व सवंर्गातील पदे भरतांना अंशकालीन पदवीधर उमेदवार, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य उमेदवारांना पसंती क्रमानुसार प्राधान्य देण्यात येईल.

**<u>वयोमार्यादा :-</u>** किमान १८ वर्ष वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवार यांना कमाल ३३ वर्ष, मागासवर्गीय उमेदवार असल्यास ३८ वर्ष, (खेळाडुची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यत वयाची अट शिथिल राहील) व अपंग, माजी सैनिक व धरणग्रस्त उमेदवारासाठी ४५ वर्ष दिनांक ३१.१०.२००९ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व वर नमुद केलेल्या वयोमर्यादापेक्षा जास्त वय नसावे.

**<u>भरतीबाबत अटी व शर्ती :-</u>**

१. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेच्या, इतर अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या सांक्षांकित छायाप्रती जोडाव्यात. जोडण्यात येणा-या प्रमाणपत्राच्या छायाप्रती शासकीय राजपत्रित अधिकारी यांनी प्रमाणीत केलेल्या असाव्यात.

२. उमेदवारांना भरती प्रक्रियेसाठी बोलविल्याबाबतचे पत्र पोस्टामार्फत पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे अशी पत्रे पोस्टाने मिळण्यास विलंब झाल्यास त्यास निवड समिती जबाबदार राहणार नाही. भरती प्रक्रियेसाठी बोलावण्यात येणा-या उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. तसेच लेखी परीक्षेचा निकाल जाहिर करतेवेळीच तोंडी मुलाखतीबाबतची तारीख नोटीस बोर्डावर लावण्यात येईल.

३. निवड यादीच्या तारखेपासून एक वर्षाकरीता अथवा नवीन यादी तयार होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत ही निवड यादी वापरात राहील.

४. नियुक्तीसाठी निवडलेल्या उमेदवारांच्या आदेशाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल.

५. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

६. निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारास नियमानुसार महसुल खात्यातील विभागीय परीक्षा, विहीत केलेल्या भाषेची परीक्षा तसेच उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७. आरक्षित पदांकरिता उमेदवाराने जात प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे अन्यथा त्यांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही. तसेच शासन सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.बीसीसी-२००८/प्र.क्र.२४२/०८/१६-ब, दिनांक १७/१०/२००८ नुसार निवड झालेल्या उमेदवारास ६ महिन्याचे आत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

८. उमेदवाराने त्यांच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

९. निवड झालेल्या उमेदवाराची औरंगाबाद जिल्हा महसूल आस्थापनेच्या अधीनस्त असलेल्या कार्यालयात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

१०. शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.:प्रानिमं २००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक १९ ऑक्टोबर,२००७ मधील सुचनानुसार लेखी परीक्षेची तारीख उमेदवारास कळविण्यात येवुन तसे जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल.

११. माजी सैनिक उमेदवाराकरिता शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक दिनांक १० ऑक्टोंबर,१९८० व दिनांक १६ एप्रिल,१९८१ नुसार शासन सेवेकरिता पात्र राहील.

१२. शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.:प्रकल्प,१००१/१०९/प्र.क्र.१५४/२००१/१६-अ, दिनांक २३ ऑक्टोबर,२००२ नुसार व इतर अनुषंगीक शासन निर्णयाचे अनुषंगाने प्रकल्पग्रस्त उमेदवार पात्र राहील. तसेच शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्र.:प्रकल्प,१००९/प्र.क्र.२३९/०९/१६-अ, दिनांक ३०/०९/२००९ मधील सुचनानुसार प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त यांची पदे भरण्यात येत असून प्राप्त होणा-या शासन निर्णयानुसार काही बदल झाल्यास त्याप्रमाणे पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

१३. महिला करीता शासन, महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्र.:८२/२००१/मसेआ-२०००/ प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे,२००१ नुसार ३० % टक्के आरक्षण अनुज्ञेय राहील.

१४. शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.:राक्रीधो/२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल,२००५ नुसार वर्ग-३ व वर्ग-४ साठी पदासाठी खेळाडू उमेदवार पात्र राहील.

१५. शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.:अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७ जुलै,२००७ व अनुषंगीक शासन निर्णयानुसार निवड झालेल्या उमेदवारांना नवीन परीभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु राहील.

१६. शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.:चापअ-१००८/प्र.क्र.२१४/०८/१६-अ दिनांक ९ जानेवारी,२००९ नुसार उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणी अहवाल असमाधानकारक असल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१७. अपूर्ण, अर्धवटरीत्या भरलेले, चुकीचे भरलेले अर्ज व जाहिरातीमध्ये दिलेल्या सुचनेनुसार काही त्रुटी आढळुन आल्यास अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१८. न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहुन सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१९. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतिम निर्ण इत्यादीबाबतचे संपूर्ण अधिकार जिल्हा निवड समिती/नियुक्ती प्राधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**२०.** उपरोक्त पदाकरीता जाहीरात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ते **दिनांक ११ नोव्हेंबर,२००९** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळुन) प्राप्त झालेल्या पात्र अर्जाचाच (विहीत नमुन्यातील अर्जाचाच) विचार करण्यात येईल. उर्वरीत अर्जांचे बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच जाहीरातीपुर्वी व जाहिरातीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**अर्ज करण्याची पध्दत**

१. उपरोक्त प्रमाणे अर्हता धारण करणा-यांनी तसेच उपरोक्त अटी व शर्ती मान्य असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज सोबत दिलेल्या नमुन्यात ए-४ आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला हस्तलिखित/टंकलिखित/चक्रमुद्रित करून अर्ज करावा.

२. आवेदनपत्र पुढील पत्यावर विहित केलेल्या अंतिम तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचेल, अशा रितीने पाठवावे. अर्ज पाठवितांना बाहेरील लिफाप्यावर ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.

३. उमेदवाराने अर्जासोबत १० सें.मी. x २२ सें.मी. आकाराचा संपूर्ण पत्ता - (पिनकोडसह) लिहीलेला व ५ रूपयांचे डाक तिकीट लावलेला लिफाफा लेखी/ मौखिक परीक्षेच्या प्रवेशपत्रासाठी पाठवावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

उमेदवाराने आपला अर्ज खालील पत्यावर विहीत मुदतीत नोंदणीकृत डाकेने/पोचदेय डाक नोंद टपालाने पाठवावा किंवा समक्ष दाखल करावा व त्या टपालाची /अर्ज दाखल केल्याची पावती जतन करावी.

**जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,**
**फाजलपुरा, औरंगाबाद - ४३१ ००१**

अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी,औरंगाबाद

# (अर्जाचा नमुना)

उमेदवाराने स्वत:चे अलीकडील छायाचित्र येथे चिटकावे.

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद.
जाहिरात - २००९

(अ)

१. अर्ज केलेल्या पदाचे नांव : -----------------

२. उमेदवाराचे पुर्ण नांव :- आडनांव नांव वडिलांचे /पतीचे नांव
---------------------------------------------------------------

३. a) कायमचा संपूर्ण पत्ता :- --------------------------------------------
--------------------------------------------
----------------- पिन कोड क्रमांक -----------

b) उमेदवाराचा दुरध्वनी संदेश क्रमांक :- कोड क्र.-------- दुरध्वनी क्र. -------------मोबाईल क्र.---------------

४. पत्र व्यवहाराचा सध्याचा :- -------------------------------
संपूर्ण पत्ता -------------------------------
----------------- पिन कोड क्रमांक ------------

५. जातीबाबत तपशील :- जात ---------------------- प्रवर्ग --------------------

६. महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहात का ? :- होय / नाही

७. उमेदवार पुरूष आहे की स्त्री आहे ? :- होय / नाही

८. उमेदवार माजी सैनिक आहे काय ? :- होय / नाही

९. उमेदवार लष्करी कारवाईत मृत्यू पावलेल्या कुटुंबीयापैकी आहे काय ? :- होय / नाही

१०. पदवीधर अंशकालीन कर्मचारी/संपकालीन कर्मचारी जणगणना कर्मचारी आहे काय ? :- होय / नाही
असल्यास तपशील द्यावा. (शिपाई संवर्गासाठी लागु नाही)

११. उमेदवाराचा अपंगाचा प्रवर्ग --------- टक्केवारी ----------

१२. जन्म दिनांक (शाळा सोडल्याचा दाखल्यानुसार) :- दि. ---- महिना ------- वर्ष ------

१३. दिनांक ३१.१०.२००९ रोजी वय :- वर्ष ----- महिने ------- दिवस -----

१४. जन्म ठिकाण :- गाव/शहर ----------------- तालुका -------------- जिल्हा -------------

१५. मातृभाषा :- --------------- १६. इतर ज्ञात भाषा :---------------------------

(ब) १. शैक्षणिक अर्हता किंवा तत्सम परीक्षेपासून उत्तीर्ण सर्व परीक्षांचा तपशील
(प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात)

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | बोर्डाचे/विद्यापीठाचे संस्थेचे नांव | परीक्षेत मिळालेले एकुण गुण | टक्केवारी | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |

१७. टंकलेखन याबाबतचा उत्तीर्ण परीक्षेचा तपशील (प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात)
(तलाठी/शिपाई संवर्गासाठी लागू नाही)

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | बोर्डाचे/ विद्यापीठाचे संस्थेचे नांव | शब्द प्र.मि. वेग | परीक्षेत मिळालेले एकुण गुण व टक्केवारी | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | टंकलेखन मराठी | | | | |
| २. | टंकलेखन इंग्रजी | | | | |

१८. संगणक प्रशिक्षित आहात काय ? (शिपाई संवर्गासाठी लागु नाही) होय/नाही
(असल्यास शासनमान्य एमएससीआयटी प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी)

(क) १. जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड /सेवायोजना कार्यालय / समाजकल्याण कार्यालय/ जिल्हाधिकारी यांच्याकडे नांवनोंदणी केली आहे काय ? होय / नाही

२. नांव नोंदणी केली असल्यास नोंदणीचा तपशील :- i) नोंदणी ठिकाण -----------
ii) नोंदणी क्रमांक -----------
iii) नोंदणी वर्ष -----------

३. नुतनीकरणाचा दिनांक :- / /

४. अर्जासांबत सहपत्रित केलेल्या साक्षांकित प्रमाणपत्रांचा /सहपत्रांचा तपशील
१. २. ३. ४.

अर्जदाराची सही

## उमेदवाराने स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

१. मी याव्दारे असे जाहीर करतो/ करते की, मी लिपीक-टंकलेखक /तलाठी /शिपाई या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे. आज रोजी मला ------- इतकी मुले हयात आहेत. त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.) आणि हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र होऊ शकेन याची मला जाणीव आहे.

२. मी असे प्रमाणित करतो / करते की, अर्जात दिलेली माहिती खरी आहे. तथापि सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहीन व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहाणार नाही.

दिनांक :- / /२००९
ठिकाण :-

उमेदवाराची सही
नांव

----------------------------------------------------------------------------------------------------

## कार्यालयीन वापरासाठी

अर्ज क्रमांक व दिनांक :- दिनांक :- / /२००९.

----------------------------------------------------------------------------------------------------